MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १७ अंक : ५ पाने-८ ■ ऑगस्ट-सप्टेंबर २०२२ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in ■ Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान व आधुनिकीकरणावर सातत्याने भर देणे आवश्यक आहे. महापारेषणसारख्या पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या कंपनीस आधुनिकीकरणावर काम करण्यास खूप संधी आहे. सर्वंकष विचार केला असता असे दिसते की, महापारेषणच्या पायाभूत सुविधांमध्ये (उपकेंद्र, तारमार्ग) फार मोठा टप्पा गाठण्यास कंपनीस यश आले आहे. नजीकच्या काळात त्यामध्ये आधुनिकीकरण आणण्याचे आव्हान आपल्या कंपनीसमोर आहे.

- **आधुनिकीकरणावर भर द्यावा**
- **कामांचा आढावा घ्या**
- **वेळेत प्रकल्प पूर्ण करा**
- **सांघिक भावना कायम ठेवा**

कंपनी फार मोठ्या प्रमाणावर ईआरपीच्या तसेच सबस्टेशन ऑटोमेशन (स्काडा अंमलबजावणी) च्या माध्यमातून आधुनिकीकरणावर प्रयत्न करत आहे. तसेच ६६ के. व्ही. उपकेंद्र अद्ययावत करून एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे प्रयत्न करत आहे. जीआयएस सबस्टेशनची निर्मिती, Assets Management, Remote Controlling, Drone Based Patrolling असे अनेक उपक्रम कंपनीने प्राधान्यक्रमावर विचारविनिमय करून अंमलबजावणी केले आहेत. त्याचबरोबर जुनी झालेली महापारेषण यंत्रणा त्यास अद्ययावत करण्याचेसुध्दा प्रयत्न युध्दपातळीवर सुरु आहेत. मला आशा आहे की, पुढील काही वर्षात आधुनिकीकरणाचा फार चांगला टप्पा पार पाडण्यास आपण यशस्वी होऊ.

महापारेषण कंपनीच्या कामगिरीचा आलेख दरवर्षी चढता असलेला आपण पाहतो. मात्र, कंपनीत होणाऱ्या दुर्घटना व त्यामधील जीवितहानी कोणत्याही परिस्थितीत आपल्याला टाळणे गरजेचे आहे. किंबहुना, दुर्घटनाविरहित यंत्रणा सुसज्ज व देखभाल ठेवणे, याकरिता आपण सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. आजमितीस फार चांगली सुरक्षा यंत्रणा आपण महापारेषणमध्ये राबवित आहोत. परंतु, तरीही दुर्घटना का घडतात? याबाबत सखोल अभ्यास करून त्यातील त्रुटींवर आपल्या सर्वांना उपाययोजना करणे आवश्यक आहे. किंबहुना प्रत्येक विभाग, मंडळ व परिमंडल यांनी सुरक्षा दृष्टिकोनातून सततचा आढावा घेऊन कंपनीची प्रणाली दुर्घटना प्रतिबंधित करण्याचे ध्येय ठेवणे गरजेचे आहे.

प्रशासन आज कालबध्द पध्दतीने परिमंडळाची आढावा बैठक घेत आहे. त्या बैठकीतून यंत्रणेला चालना मिळत आहे. प्रत्येक आढावा बैठकीतून आपल्याला कंपनीने दिलेल्या जबाबदारीचे प्रकटीकरण प्रशासनासमोर करावयाची एक चांगली संधी त्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयांना प्राप्त झाली आहे. या आढावा बैठकीतून आपण कुठे मागे आहोत? तसेच कोणत्या बाबींवर आपण चांगली कामगिरी करत आहोत. तसेच क्षेत्रीय कार्यालयांना कोणत्या प्रकारची प्रशासनातर्फे मदत किंवा साधनसामुग्रीची गरज आहे, हे लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना करता येते. माझी अशी अपेक्षा आहे की, अशा प्रकारची पुनरावलोकन व परीक्षण आढावा बैठक प्रत्येक वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्या अंतर्गत असलेल्या कनिष्ठ कार्यालयांशी घेतल्यास फार चांगल्या प्रकारचा फरक अर्थात कंपनीची एकंदरीत कार्यक्षमता वाढविण्यास मदत होईल.

कंपनीने नियोजित केलेले प्रकल्प वेळेत व नियोजित खर्चात पूर्ण करणे सर्व प्रकल्प अभियंत्यांची जबाबदारी आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्यास आपल्यासारख्या पायाभूत सुविधा देणाऱ्या कंपनीस अनेक अडचणी येणार, हे साहजिकच आहे. मात्र, त्या अडचणींवर मात करण्याचेच कौशल्य आपल्या अभियंत्यांकडे असणे गरजेचे आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ते मार्गदर्शन करून



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आपला अनुभव आपल्या चमूस देणे गरजेचे आहे. प्रकल्पांमध्ये आऊट ऑफ बॉक्स विचार तसेच सर्जनशीलतेचा (Creativity) वापर करून प्रकल्पातील अडचणींवर मात करावी लागते. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांचे विषय, अडचणी, आव्हाने वेगवेगळी असतात. त्यावर मात करण्यासाठी उपाययोजनासुध्दा स्थानिक पातळीवर शोधाव्या लागतात. प्रकल्पांमधील प्रत्येक अडचणी वेगवेगळ्या माध्यमांतून पाहणे गरजेचे असते.

संचलन व सुव्यवस्थेमध्ये नियोजनाचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कंपनीने ठरवून दिलेल्या नियोजनात्मक कामाच्या अंमलबजावणीमुळे संचलन व सुव्यवस्था उत्तम पध्दतीने राखण्यास मदत होते. कोणत्याही पध्दतीचा व्यत्यय व अनियमितता आपल्याला अनेक अडचणींना आमंत्रण देऊ शकते. त्यासाठी प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याने नियमबध्द आढावा घेऊन नियोजनात्मक कामे योग्य पध्दतीने व वेळेवर कशी पार पडतील, याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- दिनेश वाघमारे**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**



**प्रकाशगड :** आढावा बैठकीस मार्गदर्शन करताना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस. याप्रसंगी प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे व इतर अधिकारी.

## ▶ प्रकाशगडमध्ये घेतली वीज कंपन्यांची आढावा बैठक

# शहरी भागात स्मार्ट मीटर बसवावेत : उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

Follow us on :

महावितरणने आवश्यकतेनुसार सुरूवातीला शहरी भागातील ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवावेत आणि या कामात यशस्वी झाल्यानंतरच ग्रामीण भागातही स्मार्ट मीटर बसविण्यात यावेत. याशिवाय स्मार्ट मीटर हे चांगल्या कंपनीचे आणि उच्च दर्जाचे असावेत, अशा सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महावितरण व महानिर्मितीचे मुख्यालय असलेल्या मुंबई येथील प्रकाशगड येथे झालेल्या बैठकीत केल्या.

राज्याचे प्रधान सचिव (ऊर्जा) व महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल व महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांनी संगणकीय सादरीकरणाव्दारे अनुक्रमे महापारेषण, महावितरण व महानिर्मिती कंपन्यांची माहिती सादर केली. या बैठकीस महावितरण, महापारेषण, महानिर्मिती आणि महाऊर्जा या कंपन्यांचे संचालक व म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महावितरण सोबतच महानिर्मिती, महापारेषण आणि महाऊर्जा या चारही वीज कंपन्यांच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी बोलताना ऊर्जामंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महावितरणने इतर कंपन्यांची थकीत देणी देण्यासाठी केंद्र शासनाला पत्र पाठवून त्याचा पाठपुरावा करावा. याशिवाय फोटो मीटर रिडिंगचे फोटो मानवी हस्तक्षेप टाळून थेट सर्व्हर प्रणालीमध्ये येण्यासाठी प्रयत्न करावेत. सौर ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक करण्यास उत्सुक असलेल्या गुंतवणूकदारांसोबत प्राधान्याने चर्चा कराव्यात. तसेच श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारने देशभरातील वीज वितरण कंपन्यांचे क्रमवारी जाहीर केली आहे, त्यात आपण कमी पडलो आहोत. या क्रमवारीत सुधारणेसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित सर्व अधिका-यांना केले.

महानिर्मितीचा आढावा घेताना जुने सबक्रिटिकल संच टप्प्याटप्प्याने बंद करून तिथे नव्या अत्याधुनिक व पर्यावरणपूरक सुपर क्रिटिकल संचाची उभारणी गरजेनुसार व गतिमानतेने करण्याच्या सूचना श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केल्या. चंद्रपूर येथील इराई जलाशयात प्रस्तावित तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या धर्तीवर मराठवाड्यातील जायकवाडी धरणातही तसा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याची चाचपणी करण्यात यावी. खात्रीशीर वीजनिर्मितीसाठी व विशेषतः सर्वोच्च मागणीच्या काळात विजेची पूर्तता करण्यासाठी पंप स्टोअरेज जलप्रकल्पाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. वीज केंद्रांच्या कामगिरीत आणखी सुधारणा करून वीजकेंद्रातील पर्यावरण व सुरक्षितता याबाबत दक्ष राहून पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. सर्व विभागातील प्रलंबित सौरप्रकल्पांना गती देणे, कोळसा पुरवठा दर्जेदार होईल, यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे आणि कालपरत्वे जुने बंद केलेल्या वीजसंचांच्या जागेचा विधायक उपयोग करून त्यायोगे मालमत्ता चलनीकरणाच्या प्रक्रियेतून महानिर्मितीला वाढीव उत्पन्नाचा स्त्रोत शोधण्यासाठी प्रयत्न करण्यावर देखील त्यांनी यावेळी विशेष भर दिला.

Like Comment Share MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

## नियुक्ती

# महाराष्ट्र राज्य वीज सूत्रधारी कंपनीच्या स्वतंत्र संचालकपदी श्री. विश्वास पाठक

Follow us on :

ऊर्जा खात्यामधील प्रदीर्घ अनुभव असलेल्या श्री. विश्वास पाठक यांची महाराष्ट्र राज्य वीज सूत्रधारी कंपनी अंतर्गत असलेल्या महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांवर स्वतंत्र संचालक म्हणून नेमणूक झाली आहे.

मुंबई येथील महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीच्या मुख्यालयात श्री. पाठक यांनी पदभार स्वीकारला. त्यांनी यापूर्वी २०१५ ते २०२० या कार्यकाळात याच पदाचा पदभार सांभाळला होता. या काळात



त्यांनी वीजनिर्मितीची स्थापित क्षमतावाढ, भारनियमन मुक्त महाराष्ट्र यात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांनी ऊर्जा विभागाला एका विशिष्ट उंचीवर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. २०१४-२०१९ या युती सरकारच्या काळात मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ऊर्जा विभागासाठी त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. तसेच त्या कार्यकाळात त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत प्रत्येक जिल्हास्थानी ऊर्जा विभागाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचाव्या म्हणून पत्रपरिषदा घेऊन पत्रकारांशी संवाद साधला होता. यामुळे महाराष्ट्रातील जवळपास सर्वच पत्रकारांशी त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. विविध वर्तमानपत्रांमध्ये आतापर्यंत त्यांचे चारशेहून अधिक लेख प्रसिध्द झाले आहेत. श्री. पाठक हे वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर पदवीधर आहेत आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाचे फेलो सदस्य तसेच कायद्यातील पदवीधर आहेत. त्यांना कायदा, व्यवस्थापन, वित्त, कॉर्पोरेट कायदा आणि उद्योग क्षेत्रातील २५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी कॉर्पोरेट कायद्यात मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणूनही सराव केला आहे. श्री. पाठक हे स्वतंत्र संचालक म्हणून विविध सूचीबध्द आणि असूचीबध्द कंपन्यांच्या संचालक मंडळावर कार्यरत आहेत. महाराष्ट्रासाठी व्हिजन डॉक्युमेंट कमिटीच्या अध्यक्षपदाची धुरा देखील त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांना खूप-खूप शुभेच्छा!

---

## Health is Wealth

# महापारेषणमध्ये खुल्या व्यायामशाळेचे थाटात उद्घाटन

Follow us on :

महापारेषणच्या सांघिक कार्यालयातील प्रकाशगंगा इमारतीत सुरू करण्यात आलेल्या खुल्या व्यायामशाळेचे उद्घाटन प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते झाले.

या वेळी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता तथा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. सुनील सूर्यवंशी, भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. सचिन खडगी, उपमहाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री नितीन कांबळे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**मुंबई :** महापारेषणच्या प्रकाशगंगा येथील सांघिक कार्यालयात खुल्या व्यायामशाळेचे उद्घाटन करताना प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. याप्रसंगी डावीकडून सर्वश्री भरत पाटील, सतिश जाधव, सुनील सूर्यवंशी, सुगत गमरे, अनिल कोलप, नसीर कादरी, अशोक फळणीकर, भूषण बल्लाळ, रोहिदास मस्के, सुधीर वानखेडे, मंगेश शिंदे, सचिन खडगी.





---

### महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०२२

## निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.गोविंद लालसिंग जाधव | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अउदा स्थापत्य मंडळ, अमरावती | ३१.०८.२०२२ |




**नाशिक :** येथे परिमंडळस्तरीय बक्षीस वितरण सोहळ्याप्रसंगी व्यासपीठावर महापारेषणचे कार्यकारी संचालक (संचलन) सर्वश्री रोहिदास मस्के, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र गायकवाड, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) अनिल भारसाकळे, अधीक्षक अभियंता माणिक गुट्टे, प्रवीण भालेराव, विलास खाचणे, संदीप हाके आदी.

### ▶ अधिकारी व कर्मचाऱ्यांची केली आरोग्य तपासणी

# नाशिक परिमंडळस्तरीय बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

Follow us on :

नाशिक परिमंडळस्तरीय बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणचे कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के उपस्थित होते.

या सोहळ्यास पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. अनिल भारसाकळे, अधीक्षक अभियंता श्री. माणिक गुट्टे, श्री. प्रवीण भालेराव, श्री. विलास खाचणे, श्री. संदीप हाके, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. विजय नलावडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रमोद गोडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरूवातीला अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. तसेच कार्यकारी अभियंता श्री. अनंत पाठक व श्री. प्रमोद बोंडे यांनी Field level reward चे प्रातिनिधीक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. Reward व Recognition या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या असून त्यांचे महत्त्व विषद केले. तसेच प्रकल्प सुरू असताना येणाऱ्या आव्हानांवर कशा प्रकारे मात केली, याबाबतचे अनुभव कथन केले. तसेच महापारेषण कंपनीसमोरची आव्हाने आहेत, ती पेलण्यासाठी Technical advancement, infrastructure development यांच्याबरोबरच Self-Introspection ची गरज आहे, असे सांगितले.

बक्षीस वितरण सोहळ्यात Project व O &M यातील विहित Category मध्ये प्रथम व व्दितीय अशा स्वरूपात बक्षीसे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या बक्षीसाचे स्वरूप होते. प्रत्येक विजेत्या संघाने केलेली उल्लेखनीय कामगिरी Video Clips व छायाचित्राच्या स्वरूपात दाखविण्यात आली. या प्रेरणादायी Video Clips व छायाचित्राच्या माध्यमातून उपस्थित सर्वांनाच आपल्या कंपनीविषयी असणाऱ्या जबाबदारीची नव्याने जाणीव झाली.

या Field level rewards व्यतिरिक्त देखील कंपनीच्या ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटविला आहे. आपले कार्यालयीन कामकाज सांभाळून साहित्य, कला, क्रीडा, सामाजिक क्षेत्र, संशोधन, प्रबंध अशा विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेले आहे, अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात आला.

या बक्षीस वितरण सोहळ्याचे औचित्य साधून अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ नाशिकच्या वतीने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शहा हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये हाडाच्या ठिसुळपणाची तपासणी, मान, पाठ, कंबरदुखी, गुडघेदुखी, मधुमेह, रक्तदाबाची तपासणी करण्यात आली. नाशिक परिमंडळाहून विनंती बदलीवर पुणे परिमंडळात रूजू झालेले मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड यांचा निरोपसमारंभही यावेळी करण्यात आला. श्री. गायकवाड यांच्या कार्यकाळात त्यांनी अतिशय कार्यक्षमतेने काम करून तांत्रिक, वित्त व लेखा तसेच मानव संसाधन विभागात विधायक बदल घडविले, याचा आढावा घेण्यात आला. श्री. राजेंद्र गायकवाड यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

आमच्याशी कनेक्टेड रहा

MahaTranscoOfficial

@Mahatranscoltd

@maha_transco



**वाशी :** महापारेषण कंपनीच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून वाशी परिमंडळांतर्गत आयोजिलेल्या परिमंडळ पातळीवरील पारितोषिक वितरण सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील.

## ▶ गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा केला गौरव

# वाशी परिमंडळात महापारेषण कंपनीचा वर्धापनदिन उत्साहात

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून वाशी परिमंडळांतर्गत परिमंडळ पातळीवरील पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके होते. परिमंडळस्तरावरील पारितोषिक विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

यामध्ये १०० के. व्ही. पाताळगंगा उपकेंद्राला प्रथम क्रमांक, १३२ के. व्ही. डहाणू उपकेंद्राला व्दितीय क्रमांक मिळाला. २२० के. व्ही. उपकेंद्रामध्ये महापे उपकेंद्राला प्रथम तर २२० के. व्ही. कांबा उपकेंद्राला व्दितीय, अउदा वाहिनी देखभाल उपविभाग, पनवेल प्रथम तर अउदा वाहिनी देखभाल उपविभाग, कळवा यांना व्दितीय क्रमांक मिळाला. अउदा उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, खारघरला प्रथम क्रमांक तर अउदा उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, कल्याणने व्दितीय क्रमांक



पटकाविला. उत्कृष्ट कामगिरीसाठी विशेष पुरस्कार म्हणून उदादिधा ग्रहण केंद्र संवसु मंडल पडघे, अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, ऐरोली, संरक्षण स्वयंचलन संचारण मंडल, वाशी, प्रमुख भांडार, पनवेल यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे यजमानपद अउदा संवसु मंडल, पनवेल यांच्याकडे सोपविण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शितल गेडाम यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अउदा संवसु मंडल, पनवेलचे व्यवस्थापक (मा.सं.) श्री. शिवाजी पाटील, अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, ऐरोलीचे व्यवस्थापक (मा.सं) श्री. सुभाष सोनवणे, वाशी परिमंडळाचे निम्नस्तर लिपीक (मा.सं.) श्री. कृणाल मानाजी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता (पारेषण) श्री. रितेश चौधरी व उच्चस्तर लिपीक (मा. सं.) श्री. उमर तांबोळी यांनी केले. कार्यक्रमाचे आभार अधीक्षक अभियंता (स्थापत्य) (प्रभारी) श्री. मोहन ननवरे यांनी मानले.

# प्रकल्प नियोजन करताना दूरदृष्टी महत्त्वाची




**बंधू आणि भगिनींनो,**

प्रथमतः आजपर्यंत सन २०२२-२३ या वर्षात महापारेषण कंपनीने ५० हजार सर्किट कि.मी. वाहिनी उभारणीचा टप्पा पार केला, त्याबद्दल सर्वांचे हार्दिक अभिनंदन! यापैकी ७३ सर्किट कि.मी. अति उच्च दाब भूमिगत वाहिन्यांसुध्दा पूर्ण केल्या आहेत. अशा वेळी 'महापारेषण समाचार'मधून माझ्या सहकाऱ्यांशी संवाद साधणे, ही माझ्यासाठी खरं तर एक आनंदाची बाब आहे.

विशेष म्हणजे मी संचालक (प्रकल्प) या पदाचा कार्यभार घेतल्यापासून म्हणजेच ऑक्टोबर २०२१ ते सप्टेंबर २०२२ या एक वर्षाच्या कालावधीतील प्रगती समाधानकारक आहे. या काळात प्रकल्प विभागाने केलेल्या प्रगतीचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे.

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | अ.उ.दा. उपकेंद्रे (संख्या) | १३<br>(महापारेषण-६, ओ.आर.सी.-७)<br>(४०० के.व्ही.कर्जत, लोणीकंद-॥ स्तर निर्माण, १३२ के. व्ही. कोथळी, कर्की, धडगाव व अमरापूर) |
| २. | परावर्तन क्षमता | १५५२ |
| ३. | अ.उ.दा. वाहिन्या (सर्किट कि.मी.) | ५२५ |
| ४. | रिऍक्टिव्ह क्षमता (एम.व्ही.ए.आर.) | २५०<br>४०० के.व्ही.कर्जत व कोराडी-॥ |

ज्यांनी हे साकारण्यास सहकार्य केले, अशा सर्व संबंधित मुख्य अभियंता आणि त्यांचे सर्व अभियंते/अधिकारी/कर्मचारी यांचे मी अभिनंदन करतो. या कालावधीत पूर्ण झालेल्या सर्व योजनांचे भांडवलीकरण करून संबंधित उपकेंद्र व वाहिनीवर प्रत्यक्ष वीजभार घेण्यात आला आहे. यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास झालेल्या विलंबामुळे होणारा खर्च (Cost Overrun) कमीत-कमी राखण्यास मदत झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे अलीकडच्या काळात ४०० के. व्ही. कर्जत आणि २२० के. व्ही. अमरापूर उपकेंद्रे कार्यान्वित करून त्यावर वीजभार घेण्यात आपण यशस्वी झालो आहोत. आपले क्षेत्रीय अभियंते व कर्मचारी यांनी संबंधित महूसूल/पोलीस आणि इतर शासकीय विभागांच्या मदतीने ROW समस्यांचे निराकरण करण्यास केलेल्या पाठपुराव्यामुळे व दिवस-रात्र एक करून केलेल्या मेहनतीमुळे हे लक्ष्य साध्य करणे शक्य झाले.

सप्टेंबर-२०२२ या महिन्यात आपण प्रत्येक परिमंडळाचा मंडळनिहाय 'मध्य-वार्षिक आढावा (Mid-Year Review) घेतला आणि विविध योजनांचे महत्त्व, त्यामधील अडथळे आणि प्रस्तावित उपक्रमांबाबत चर्चेच्या माध्यमातून महापारेषणचे उद्दिष्ट निश्चित केले. ऑक्टोबरपासून सुरू होणारा प्रत्यक्ष कामकाजाचा हंगाम लक्षात घेता हा मध्य-वार्षिक आढावा योग्य वेळी घेण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांचे वार्षिक मूल्यमापन अहवाल (KRA/KPA) सदर निश्चित केलेल्या लक्ष्यावर आधारित असतील.

काही वर्षांपूर्वी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथे आपल्या मानव संसाधन विभागाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणात मी भाग घेतला होता. या दरम्यान, जमिनीला तसेच एकमेकांना स्पर्श न करता यासारखे काही निकष देऊन इमारतीच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाण्याचे भौतिक लक्ष्य पूर्ण करण्यासाठी काही कार्डबोर्ड/ड्रॉइंग पेपर/शीटस देण्यात आले होते. सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना दोन तुकड्यांमध्ये विभागण्यात आले. एका तुकडीने दिलेले कार्य लवकर पूर्ण केले म्हणून त्या तुकडीला यशस्वी घोषित केले. प्रशिक्षकांनी केलेल्या विश्लेषणानुसार ज्या तुकडीने नियोजनावर भर दिला त्यांना विजयी पताका मिळाली. याचप्रमाणे आपल्या दैनंदिन कामकाजातही आपल्याला योग्य नियोजन करावे लागेल. 'Plan your work and work your Plan' या आशयाची एक प्रसिध्द इंग्रजी म्हण आहे. त्यामुळे आपणही योग्य आणि वेळेवर दूरदृष्टीने नियोजन करण्यावर भर दिला पाहिजे.

उपकेंद्राचे नियोजन करताना जमिनीची निवड ही महत्त्वाची बाब असते. वीजभार परिसर/केंद्र जवळ असणे, उपकेंद्राचे स्थळ पोहोचण्याच्या (संचलन व सुव्यवस्थेच्या दृष्टीने) सोयीची असणे, जमीन समतल असणे (जमिनीचा विकास खर्च टाळण्यासाठी), स्त्रोत उपकेंद्रापासून प्रस्तावित उपकेंद्र आणि आऊटगोइंग वाहिन्यांचे अंतर कमी असणे (दिवसेंदिवस गंभीर होत असलेली ROW समस्या विचारात घेऊन) यामुळे खर्च कमी होण्यास व प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यास मदत होते. योजनेचे Cost Benefit Analysis करण्यावर मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा नेहमीच आग्रह असतो. Cost Benefit Analysis केवळ जमिनीच्या निवडीस लागू नसून ती योजना तयार करण्यापासून पुढील प्रत्येक टप्प्यास व कोणत्याही प्रकारच्या योजनेस उपयुक्त असते.

माझ्या मते, एखादी व्यक्ती दूरदर्शी असेल तर अशा व्यक्तीस योजना तयार करून तिची यशस्वीरित्या अंमलबजावणी करणे शक्य होते. महावितरणचा आऊटगोइंग व्होल्टता स्तर ३३/२२ kV असला तरी, योग्य त्या पर्यायांसह तांत्रिक सुसाध्यता प्रस्थापित झाल्यावर राज्य पारेषण उपक्रमाचा वीजभार-प्रवाह अभ्यास (Load Flow Study) आपल्या स्त्रोत उपकेंद्राचा २२० kV किंवा १३२ kV व्होल्टता स्तर ठरविण्यात निर्णायक भूमिका बजावतात. विशेषतः मुंबई, पुणे व नाशिक रिंग मेनमधील नवीन वाहिन्या उभारताना भविष्यातील वीजपुरवठ्याचा विचार करता योग्य क्षमतेचा कॉरिडॉर असणे आवश्यक आहे.

नवीन महापारेषणचे उपकेंद्र, O.R.C/अ.उ.दा. ग्राहक व निर्मिती प्रकल्प यांच्या रेडियल कनेक्टिव्हिटीवर भर देण्यात येतो. जर एखाद्या प्रकल्पात LILO प्रस्तावित असल्यास, आऊटेज निकषास सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असावे. त्याचप्रमाणे वाहिनींना उपकेंद्रास सुरूवातीच्या तीन कि.मी.साठी मल्टी सर्किट वाहिनी उभारणेबाबत मार्गदर्शक सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. जेणेकरून भविष्यात त्यावर वाहिन्या उभारणे सोपे होईल. किमान RoW अडथळ्यांसह वाहिनीची उभारणी सुनिश्चित करण्यासाठी वाहिनी प्रोफाइलसह (Line Pro-files) वाहिन्यांचे तपशीलवार सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. काही विभागीय कार्यालयांबाबत असे निदर्शनास आले आहे की, जरी वाहिनीचे अंदाजपत्रक सादर केले असले/योजना मंजूर झाली असली तरी वनविभागाच्या मंजुरीसाठीचा प्रस्ताव तयार नसतो. हे सर्वज्ञात आहे की, पर्यावरण मंजुरीसाठी सर्वाधिक वेळ लागतो. म्हणून वनप्रस्ताव वेळेवर सादर करण्यासाठी योग्य काळजी घेणे आवश्यक आहे.

अ. उ.दा. व उच्चदाब वाहिनी क्रॉसिंग व दोन क्रॉसिंगमध्ये योग्य अंतर राखण्यासाठी आवश्यक ती काळजी घेतल्यास व योग्य उंचीच्या अतिरिक्त मनोरा विस्ताराचा (Tower Extension) वापर केल्यास आऊटेज कालावधी व परिणामी वेळ व खर्चात बचत केली जाऊ शकते. अ. उ. दा. वाहिनी क्रॉसिंगच्या महत्त्वानुसार ऑनलाईन स्ट्रिंगिंगमधील नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावयास हवा. क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मागील काळातील मनोरा कोसळण्याच्या घटना, बॅक स्टेची आवश्यकता व त्यात समाविष्ट असलेला RoW, B किंवा Q प्रकारच्या टॉवरचा कमीत-कमी वापर केल्यास आपली कार्यक्षमता आणखी वाढेल. तसेच नदी/खाडी/रेल्वे/महामार्ग/मेट्रो क्रॉसिंगलाही अशाच प्रकारे महत्त्व देणे आवश्यक आहे. वनविभाग देखील झाडांच्या फांद्या, वृक्ष तोडणे टाळण्यास सांगत आहे. यासाठी दोन मनोऱ्यांमधील अंतर लांब (Long Span) असलेल्या ठिकाणी उंच मनोऱ्यांचा वापर करण्याबाबत विचार करता येईल.

आपले अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधत असताना ते त्यांच्यासमोर येणारी आव्हाने व त्या आव्हानांवर त्यांनी कोणत्या प्रकारे मात केली याबाबत मनोगत व्यक्त करतात. मात्र, असे सांगावेसे वाटते की, आपले कित्येक अधिकारी, कर्मचारी चांगली कामगिरी करतात. परंतु, सादरीकरण/लेखन किंवा अन्य मार्गाने आपली कामगिरी मांडण्यास कमी पडतात. यानिमित्ताने मी आपणा सर्वांना आवाहन करतो की, ज्या अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी प्रकल्प उभारणीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अडथळ्यांचा सामना करून त्या अडथळ्यांवर यशस्वीरित्या मात केली आहे त्यांनी लेखनाच्या व छायाचित्र/दृकश्राव्याच्या माध्यमातून आपले मनोगत मांडावे. निवडक मनोगते आपल्या संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द केले जातील. यासाठी मी POSOCO यांच्या संकेतस्थळाचे उदाहरण देऊ इच्छितो. जेथे त्यांनी दि. ९ एप्रिल २०२० रोजी झालेला वीजभार/निर्मिती बॅलन्स, घटना-पूर्व आणि घटनेनंतरचे विश्लेषण योग्य पध्दतीने प्रसिध्द केले आहे.

सरतेशेवटी मी सर्व प्रकल्प मंडळांच्या अधीक्षक अभियंता व विभागीय कार्यकारी अभियंत्यांना आवाहन करतो की, कार्यालयीन व प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी (Work Site) वेळेच्या पालनाबाबत स्वतःच्या आदर्शाव्दारे आपल्या अखत्यारीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांसमोर उदाहरण ठेवावे. जेणेकरून त्यांना प्रेरणा मिळेल व येणारा प्रत्यक्ष कामकाजाचा काळ (Working Season) योग्यप्रकारे वापरून सन २०२२-२३ साठी निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल. जाता-जाता सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना येणाऱ्या दिवाळी सणाच्या मंगलमय व प्रकाशमय शुभेच्छा!

**– नसीर कादरी**
संचालक (प्रकल्प), महापारेषण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महापारेषणमध्ये ७६ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीत ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप. शेजारी ध्वजारोहणप्रसंगी उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग.

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे भारताचा ७६ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरूवातीला महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांनी ध्वजारोहण केले.

यावेळी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. संदीप कलंत्री, श्री. भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*From the Desk of Director, HR*

# संगीत एक ध्यानधारणा!

मानवाला मिळालेली उत्तम देणगी म्हणजे संगीत. मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबरच संगीताचा विकास झालेला आहे. संगीत ही निसर्गातील सुंदर रचना आहे. आज संगीत हे जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. रोजच्या घाईगर्दीच्या आणि कामाच्या धकाधकीच्या, चिंतेच्या वणव्यात आणि नीरस आयुष्यात चैतन्य आणण्याचे काम करते ते केवळ संगीतच! संगीतामुळे आपले जीवन सुसह्य झाले आहे. साहित्य, संगीत आणि कला यांचा गंध नसलेली व्यक्ती ही शिंगे व शेपटी नसलेल्या पशूसमान आहे. दैनंदिन जीवनात संगीताचे स्थान खूप महत्त्वाचे आहे.

उपासनेसाठी विविध प्रार्थना आहेत. दैनंदिन जीवन जगत असताना या प्रार्थना जर संगीताच्या मदतीने गायल्या तर निश्चितच त्यातून योग्य परिणाम साधला जातो. देवळातील भजन, कीर्तन असेल अथवा मशिदीमधील अजान असेल; गुरुव्दारातील गुरुबाणी असेल किंवा चर्चमध्ये गायल्या जाणाऱ्या प्रार्थना असतील, या उपासनेला सप्तसुरांचा साज चढवलेला असतो. त्यामुळेच आपल्याला त्या अलौकिक शक्तीची अनुभूती येते.

संगीत हे एक प्रकारची ध्यानधारणाच आहे. तणाव घालवण्याची चांगली पध्दत आहे. यामुळे मूडही चांगला राहतो. तज्ज्ञांच्या मते, ध्यानधारणा केल्याने वायफळ चिंता आणि नकारात्मक विचारांपासून मुक्ती मिळते. तसेच यामुळे एकाग्रताही वाढते आणि तणाव घालवण्यासाठी आवश्यक असलेली मन:शांतीही मिळते.

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असल्यातरी त्याला मनोरंजनाचीसुध्दा तेवढीच गरज असते. जेव्हा माणसाला कंटाळा येतो, थकवा येतो. अशा वेळी त्यांचा थकवा नाहीसा होऊन चैतन्य निर्माण होते. अशा वेळी संगीतामुळे त्याचे चांगले मनोरंजन होते व तो पुढील कामे व्यवस्थित करू शकतो. अशा प्रकारे मनोरंजनासाठीही संगीत उपयुक्त ठरते.

कष्ट करताना संगीत ऐकले तर कष्टाची जाणीव होत नाही. एखादे कंटाळवाणे काम जर संगीत ऐकत केले तर ते काम लवकर होते. पूर्वी स्त्रिया जात्यावर दळण दळायच्या तेव्हा श्रमाची जाणीव न होण्यासाठी त्या ओव्या गायच्या. शेतकरी, कामगार विविध कामे करताना वेगवेगळी गाणी म्हणतात. अशा प्रकारे श्रमपरिहारासाठी संगीत हे उत्तम माध्यम आहे.



या धावपळीच्या युगात हरवलेली मन:शांती पुन्हा मिळवण्यासाठी संगीतासारखे दुसरे माध्यम नाही. आपल्या शरीर व मनावर रोज असंख्य आघात होत असतात. ते सोसण्याचे सामर्थ्य संगीतामुळे प्राप्त होते. संगीतामुळे आपण तहानभूक विसरतो. व्यथा वेदनांचा आपल्याला विसर पडतो. संगीताच्या ध्वनीलहरींमुळे ध्यानधारणा सहज होते. विचलित होणाऱ्या मनाला शांत करण्यासाठी संगीतच उपयुक्त ठरते.

माणूस प्रत्येक गोष्ट आनंदासाठी करत असला तरी संगीतातून मिळणारा आनंद हा अलौकिक असतो. संगीतामुळे आनंदाचे चार क्षण आपल्या वाट्याला येतात. काही काळापुरते का होईना आपण दु:ख विसरतो. संगीताच्या सान्निध्यात आल्यानंतर स्थळ काळाचा विसर पडतो. म्हणूनच संगीतातून मिळणारा आनंद हा सुखदु:खांच्या पलीकडचा असतो.

संगीत हा साधनेचा विषय आहे. संगीताची साधना केल्यामुळे एकाग्रता वाढते. यातील स्वर लावणे, स्वरांचा विस्तार करणे, लय-तालांचे प्रकार हाताळणे यासाठी एकाग्रतेची आवश्यकता असते. त्याचबरोबर संगीत हे सात सुरांवर आधारलेले आहे. संगीताच्या अभ्यासाने पाठांतर क्षमता, ग्रहण क्षमता व स्मरणशक्ती विकसित होते. तसेच वाद्यातील काही बोलही सारखेच असतात. त्यांना विविध तालात व वादन प्रकारात वाजवत असताना एकाग्रता व स्मरणशक्ती वाढते.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात अनेक राष्ट्रभक्तीपर गीतांचा उपयोग झाला. अनेक व्यक्ती जेव्हा समूहाने राष्ट्रभक्तीची गीते गातात, तेव्हा सर्व हेवेदावे विसरून त्या एकत्र येतात. त्यांच्यात सामूहिक भावना जागृत होऊन राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते.

शाळेच्या सुरुवातीला मुले प्रार्थना म्हणतात. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागतगीत गायले जाते. नाटकाची सुरुवात नांदीने होते. डोंबारी, मदारी व गारुडी आपला खेळ सुरू करण्यापूर्वी विविध वाद्ये वाजवतात. कुस्ती खेळणाऱ्या पहिलवानाला स्फूर्ती येण्यासाठी हलगी वाजवतात. त्यामुळे वातावरण निर्मिती होते. उत्पादकांना आपले उत्पादन लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आकर्षक जाहिराती कराव्या लागतात. ही जाहिरात संगीतमय असेल तरच त्याचा प्रभाव ग्राहकांवर होतो. अशा प्रकारे संबंधित उत्पादनांची विक्री वाढवण्यासाठी संगीतमय जाहिराती उपयुक्त ठरतात.

निसर्ग हा मानवाचा पहिला गुरु! चराचरामध्ये संगीत सामावलेले आहे.

मानवाने आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी निसर्गातल्या वेगवेगळ्या नादांचे अनुकरण केले. सकाळच्या प्रहरी सुटलेल्या गार वाऱ्याचे गुंजन, झऱ्याचा खळखळाट, पक्ष्यांचा किलबिलाट, विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट, हृदयाची स्पंदने, नाडीचे ठोके यातून संगीताची अनुभूती येते. कदाचित यातूनच पुढे गायन, वादन व नृत्याची सुरुवात झाली असावी. थोडक्यात संगीत हाच मानवी जीवनाचा आधार आहे. संगीत हे सागराप्रमाणे अथांग आहे. संगीत साधनेसाठी आयुष्य अपुरे पडेल. म्हणून या संगीताचा आनंद घेऊन आपले जीवन सुसह्य व आनंदी करूया.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**
**संचालक (मानव संसाधन)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)
MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.